वाचन पातळी ४

दोस्ती झिंदाबाद! मुलांसाठी विनोदी नाटुकले

Author: Meera Dixit

Illustrator: Shailja Jain Chougule

Translator: Meera Dixit

पात्र परचिय

रीटा राकेश यश शीला रोहन

११ ते १४ या वयोगटातील, एकमेकांचे घट्ट मित्र.

विक्रम यमदूत यमराज दरवान

विक्रम - या टोळक्यातला लोकप्रिय मुलगा आणि त्यांच्या क्रिकेट संघाचा कर्णधार.

यमदूत - यमराजाचा दूत. विक्रमला उचलून आणण्याची आज्ञा त्याला मिळालेली आहे.

यमराज - मृत्यूदेव यमराज. इथे मात्र तो विनोदी, बालिश, सतत कार्टून बघणारा दाखवला आहे.

दरवान - यमराजाच्या दरबारात दाराबाहेर उभा राहणारा रखवालदार.

पडद्यामागे

नेपथ्य आणि वेशभूषा सांभाळणारे, प्रकाश आणि ध्वनी व्यवस्था बघणारे, समूहगायन करणारे गट.

नाटुकले बसवताना –

मुलांना नाटक बसवायला खूप आवडतं. कसली मजा असते त्यात! मात्र चांगल्या नाटकांची संहिता मिळत नाही हाच मोठा प्रश्न असतो. नाटक पटकन आवडेल असं हवं, खळखळून हसवणारं हवं, बेताच्या लांबीचं हवं आणि मुलांच्या कल्पनाशक्तीला वाव देणारं हवं. बसवायला सोपं तर हवंच हवं. पण असं नवं नाटक मिळिणार कुठे? मीरा दीक्षिति यांनी 'दोस्ती झिंदाबाद' लिहिलिं ते नेमकं याच गरजेतून. मुंबईच्या शाळेत २०११ मध्ये त्याचा पहिला प्रयोग झाला. यमदूताची फजिती आणि मुलांची एकी हा विषयच असा होता की मुलं खूष झाली.

वेशभूषा आणि नेपथ्य

लढवा तुमच्या स्वतःच्या कल्पना. कागद, वर्तमानपत्र, थर्माकोल ज्या काही गोष्टी शाळेत सहज उपलब्ध असतील त्यातून नेपथ्य उभे करता येईल. तीन ठिकाणी हे नाटक घडते. सुरवातीला सगळे मित्र भेटतात ती बाग, विक्रमची खोली आणि यमराजाचा दरबार. वेशभूषा करताना यमदूत आणि यमराजाचे कपडे आणि भरदार मिश्या या गोष्टी सोप्या आहेत. गळ्यात चित्र-विचित्र माळा आणि शिंगं यांनी एकदम बहार येईल.

संगीत आणि गाणं

या नाटकात जे गाणं आहे त्याला चाल लावा, पडद्यामागचे कलाकार ते गाणं समूहस्वरात गातील. प्रसंग अधिक नाट्यमय होण्यासाठी काही ठिकाणी वाद्यांचा वापर करा.

परवानगीची गरज नाही

इतर पुस्तकात तुम्ही वाचता की, 'नाटक बसवण्यापूर्वी लेखकाची कवि प्रकाशकाची परवानगी घेणं आवश्यक आहे.' इथे मात्र तुम्हाला काही करावं लागणार नाही. तुम्हाला हवा तसा नाटुकल्याचा वापर करा. एखादी नवी कल्पना सुचली तर ती त्यात घाला. स्वतःला मोकळं सोडा. आणि बसवून बघा हे मजेदार नाटुकलं!

तुमच्या प्रयोगाचे फोटो, नव्या कल्पना जरूर info@prathambooks.org या पत्यावर मेल करा. 'प्रथम बुक्स' च्या ब्लॉगवर त्या टाकता येतील.

प्रवेश १

(पडदा उघडतो तेव्हा बागेमध्ये काही मुलं – मुली खेळत असतात.)

रीटा: अग शीला, तुला कळलंय ना, आपल्या विक्रमला खूपच बरं नाहीये, ताप येतोय त्याला. मलेरिया झालाय म्हणे...

राकेश: अग हो रीटा, मी कालच फोन केला होता त्याच्या घरी. आधी वाटलं, का येतोय ताप सारखा सारखा. आता व्यवस्थिति औषधपाणी सुरू केलंय.. मावशी सांगत होत्या..

शीला: बिचारा! आता परीक्षा कशी देणार रे तो?

यश: बिचारा कसला? लकी फेलो म्हण लकी फेलो! अभ्यासाला आयतीच सुट्टी मिळाली त्याला. नाही तर मी बघ, अभ्यास एके अभ्यास!

रीटा: (हसत हसत) यश, तू आणि अभ्यास? काही दूरचं तरी नातं आहे का रे तुमच्यात?

यश: हे बघ रीटा, परत सुरू केलंस हां तू? ... आणि तू काय केलंस ते सांगू का सगळ्यांना? ते.. ते.. परवाचं? सांगू?

रीटा: ए गप्प बस बरं आधी, बास झालं तुझं.

रोहन: हे बघा, झालं यांचं तसिरं महायुद्ध सुरू. सारखे भांडतच असतात. आपण विक्रिमच्या तापाबद्दल बोलत होतो ना... जायचंय ना त्याला भेटायला?

रीटा: अरे पण हा बघ ना... शंख कुठला!

(यश तिच्याकडे बघून वेडीवाकडी तोंडं करत असतो. त्याच वेळेस सगळे रंगमंचावरून विंगेत जातात.)

प्रवेश २

(दुसऱ्या वगिेतून सगळे रंगमंचावर परत येतात. आता वक्रिमच्या घरात ते आलेले आहेत. वक्रिम एका वचित्रि कपडे घातलेल्या माणसाशी बोलतो आहे. या बोलण्यावरून असं कळतंय की तो त्रासलेला आहे.)

यमदूत: (बछिान्यावर वक्रिम झोपलेला असतो, त्याच्याकडे बघत) चलो बालक, मी तुला न्यायला आलोय. तुझी एक्स्पायरी डेट जवळ आलीये. (खशिातून चठ्ठिी काढत) हे बघ, यमराजांची आज्ञाच आहे तशी! तेव्हा सगळ्यांना 'अच्छा' कर आणि चल माझ्याबरोबर.

वक्रिम: क्काय? कोणाची आज्ञा? व्हॉट डू यू मीन? हा सगळा काय प्रकार आहे?

(यमदूत वक्रिमला बछिान्यावरून उठवण्याचा प्रयत्न करत असतो. त्याचं वेळेकडे लक्ष असतं. सगळी मुलं हा प्रकार थक्क होऊन बघतच राहतात.)

वक्रिम: अहो, माझं ऐकून तरी घ्या जरा...

यमदूत: वेळ नाही रे बाबा माझ्याकडे तुझं ऐकून घ्यायला. लवकर नघायला हवं. तुला वर पोहचवल्यावर मला दल्लिीला जायचंय. तथिली अपॉइन्टमेन्ट आहे. कम ऑन, डोन्ट वेस्ट माय टाईम. आम्ही खूप बझिी असतो बाबा, आम्हाला सध्या ओव्हर टाईम करावा लागतोय. काय करणार? आलयि भोगासी.. झालं!

यश: ए... कोण तू? आणि फार ऐकून घेतलं हां तुझं. खूप झालं आता!

शीला: नाही तर काय?

रीटा: आणि तू यमदूत काय? कोणाला वर न्यायच्या गोष्टी करतोस रे?
(सगळी मुलं यमदूताला घेराव घालतात.)

विक्रम: अरे हे आहेत यमदूत महाशय, भेटा यांना. आणि माहितीय का, यमराजांच्या आज्ञेनुसार हे मला वर न्यायला आलेत.

राकेश: (जरासा गोंधळत) वर घेऊन जाणारेत? म्हणजे?

शीला: कहर झाला बाई अगदी!

रोहन: ए यम्या, तू कोणाला न्यायला आलाहेस? याला? (विक्रमकडे बोट दाखवत) आणि तेही आमच्या परवानगीशिवाय? हाऊ डेअर यू? हमितच कशी झाली तुझी?

यश: (यमदूताच्या खांद्यावर हात ठेवत) सुनो यमभाई, हा विक्रम कोण आहे माहितेय का? आमचा जानी दोस्त. आमच्या गँगचा लीडर.

शीला: आमच्या क्रिकेट टीमचा कॅप्टन आहे, काय समजलास?

राकेश: त्याला साधा मलेरिया झाला, तर काय लगेच त्याला घेऊन जायला आलात?

रीटा: धिस इज टू मच. अति होतंय हे. ही तर चक्क दादागिरी झाली.

राकेश: अग दादागिरी नाही, यमगिरी आहे ही यमगिरी...
(एव्हाना यमदूत हताश झालेला असतो. मशिा परिगाळत असतो. यमराजाच्या क्रोधाची त्याला पुरेपूर कल्पना असते.)

यश: ते काही नाही, यमभैया, तुम्ही आमच्या मित्राला घेऊन जाऊ शकत नाही. नाही म्हणजे नाहीच. (सगळे विक्रमपाशी जातात.) आणि हे बघा यमराज महाशय...

यमदूत: अरे हे काय? कधी भैया कधी महाशय, एक काहीतरी ठरवा ना.. माझा गोंधळ होतो रे मग!
(यावर मुलं जोरजोरात हसतात.)

राकेश: ते तर दिसतंच आहे. पण एक मात्र खरं की विक्रम कुठेही म्हणजे कुठेही जाणार नाही, समजलास?

रोहन: असा कसा घेऊन नेऊ शकतोस तू विक्रमला?
(यमदूताला काहीच समजत नसतं. त्याची नजर सारखीच घड्याळाकडे असते.)

यमदूत: (घाबरून) हे भगवान! (जीभ चावतो. स्वत:च्या गालावर थपडा मारून घेतो.) हे यमराज, आता काय करू मी यांचं? चल बाळ वक्रिम. (वक्रिमकडे घाईघाईने जात म्हणतो.)

रोहन: (रोहन यमदूतासमोर ढालीसारखा उभा राहतो.) आता काय करू मी याचं?

राकेश: काय करू म्हणजे काय? लोणचं घाल हवं तर..

यश: (यमदूताकडे वळून) हं! तर राकेश मघाशी काय म्हणत होता तुला, वत्सा... (यमदूत इकडेतकिडे बघायला लागतो. आता हा 'वत्सा' कोण असा त्याला प्रश्न पडतो.)

यमदूत: मी?
यश: हो. तूच.

रोहन: ..तर आम्ही तुला काय सांगत होतो, हे एकवसिावं शतक आहे महाशय. भारत देश आहे भारत आणि आता...

शीला: ... आता भारतात मलेरिया हा काही जीवघेणा आजार राहलिला नाहीये, मिस्टर

रोहन: आमचा मित्र औषध घेतो आहेच की मलेरियावरचं. हो की नाही रे विक्रम?

विक्रम: हे बघ, या माझ्या गोळ्या. आणि आता माझा तापही उतरतोय म्हटलं...

रीटा: ...आणि थोड्याच दिवसांत हा पूर्ण बरा होणार आहे, अगदी ठणठणीत. या मलेरियाची ऐशी की तैशी!

शीला: तुम्ही त्याला घेऊन जाऊच शकत नाही. या एवढुश्या आजाराची ही एवढी मोठी शिक्षा?

यश: ती पण भारतात? नो वे! शक्यच नाहीये हे!
(सगळे मिळून आरडाओरडा करतात.)

यमदूत: चूप! गप्प बसा.तो कसा बरा होईल? त्याचे दिवस भरलेत आता. व्हा बाजूला, मला आता नेलंच पाहिजे त्याला नाहीतर...

राकेश: दिवस त्याचे नाहीत, तुझेच भरलेत... बघायचंय? (सगळे मिळून यमदूताला मारतात.)

यमदूत: अग आई ग! किती मारताय? मेलो रे बाबा. अरे, हात आहेत की हातोडे?

यश: अरे, हा तर नुसता पक्चिरचा ट्रेलर होता. पक्चिर बघायचाय?

यमदूत: (रडवेला होत) नको नको.

यश: नाही ना? मग वक्रिमला न्यायचं नाही इथून. तरच सोडतो तुला नाही तर...

यमदूत: ते शक्यच नाही. मला याला घेऊन जावंच लागेल. नाहीतर नोकरीवरून काढून टाकतील मला! नोकरीशविाय मी घर कसा चालवू? आजकाल महागाई कतिी वाढली आहे. काय मुसीबत आहे ही!
(तो वक्रिमचा हात पकडतो.)

शीला: अरे, तुझ्या नोकरीला मार गोळी.

रीटा: आणि तसंच असेल तर आम्हीपण येणार तुझ्याबरोबर. हा एकटाच नाही.

रोहन: तसा पण आम्हाला यमराजांना जाब वचिारायचाच आहे.

राकेश: मलेरयिा झाला म्हणजे काय? सरळ उचलूनच न्यायचा त्याला? ही दादागरिी मुळीच चालणार नाही. (सगळेजण 'नही चलेगी नही चलेगी, दादागरिी नही चलेगी' चे नारे लावतात.)

शीला: न्यायचं आहे ना वक्रिमला. मग आम्ही सगळे येतो. तसंही यमराजांना भेटणं होईल.

यश: काय समजतात हे यमराज स्वत:ला? वक्रिमला उचला म्हणे. बघतोच तुम्हाला आम्ही. वी आर रेडी. चला रे..
(यमराज आता पूर्णपणे हैराण झालेले असतात. आता आपलं काही खरं नाही हे त्यांना पक्कं कळून चुकतं.)

यमदूत: काय पनवती आहे! चला, अब आगे जो होगा, मंजुरे यमदूतही होगा.
(सगळी मुलं रंगमंचावरून नघिून जातात.)

प्रवेश ३

(मुलं यमराजाच्या दरबाराकडे चाललीत.)

(आता यमराजांच्या दरबारात प्रवेश करतात. त्यांचा आरडाओरडा चालूच असतो.)

दारवान: ओ शुक शुक, यमदूत महाशय? एवढी सगळी मुलं कुठून घेऊन आलास रे? माझ्या माहितीप्रमाणे एका मुलाचंच परमिट होतं ना तुझ्याकडे?

(यमदूत मान हलवतो.) मग? ही किती मुलं आणली आहेस? तुझं गणित तसं कच्चंच आहे म्हणा. (दारवान हसतो.)

यमदूत: इथे जीव जायची पाळी आलीये. आणि ह्याला विनोद सुचताहेत. मी काय मूर्ख वाटलो काय रे तुला दारवाना? दिसित नाही? अरे हे बघ, माझा अवतार बघ. माझे गाल बघ किती लाल झालेत.

(मुलं यमराजांना भेटायला अगदी अधीर झालेली असतात. रोहनने मात्र विक्रमचा हात अगदी घट्ट पकडलेला असतो.)

यमदूत: अरे, ही मुलं ऐकतच नव्हती. ह्याला नेलंत तर आम्ही सगळेच येणार असा हट्ट करायला लागली.
रीटा: हो! मग बरोबरच आहे.

दारवान: श्श्य, जरा हळू बोला ना. आजपर्यंत त्यांच्याशी असं कोणी बोललं नव्हतं हं. (मुलं आवाज करत असतात.)

राकेश: अरे हड, होतोस बाजूला की देऊ एक?
(हात उचलणार तेवढ्यात यमराजांचा आवाज.)

यमराज: अरे, कोण एवढा आरडाओरड करतोय? माहतीये ना माझी कार्टून नेटवर्क बघण्याची वेळ आहे ही. मला डस्टिर्ब नका करू. नाही तर मी...

दारवान : महाराज सॉरी, पण इथे भारतातली बरीच मुलं -मुली आली आहेत. वक्रिम घेऊन आलाय त्यांना.

यमराज : (आतूनच) वक्रिमला आणला आहे की नाही?

यमदूत: आणला आहे महाराज, हा काय. पण त्याच्याबरोबर त्याचे मत्रिही आले आहेत महाराज.

ऐकतच नव्हते. वक्रिमला नेलं तर आम्ही पण येणार असा हट्टच धरून बसले. नाही म्हणालो तर मारून मारून माझा बैंगन भरता करून टाकलाय. बघा बघा, माझे गाल बघा. मला माफ करा हो...

(मुलांची उत्सुकता खूपच वाढले ली असते. यमराज हाय! हाय! असे नारे सुरू होतात.)

यमराज: अरे केवढा आवाज करताहेत. पाठवा त्यांना आत. बघूनच घेतो एकेकाला. यमराज हाय हाय काय?

प्रवेश ४

शीला: अय्या आपल्याला खरेखुरे यमराज भेटणारेत. सो एक्सायटिंग!

मुलं: चला रे! हे...!

दारवानाला ढकलून सगळे यमराजाच्या महालात प्रवेश करतात.

रोहन: अरे साक्षात यमराज! अलभ्य लाभ! अलभ्य लाभ!

राकेश: (यमराजांच्या खांद्यावर हात ठेवतो. यमराज बघतच राहतात.) हाय यमराज! हाऊ आर यू? सगळं ठीकठाक ना?

यमराज: ए संभालके बात कर. मी कोण आहे माहिती आहे ना? मी यमराज आहे यमराज. (ताठ उभा राहतो.) आणि हात काढ आधी.

शीला: सो व्हॉट, मी शीला आहे शीला. फ्रॉम मुंबई. समजलं? (मुलं कुजबुज करत असतात.)

यमराज: चूप्प! तुमच्यापैकी विक्रम कोण आहे? त्याने लवकर पुढे या. त्याच्या मृत्यूची वेळ ऑलरेडी होऊन गेली आहे. तेव्हा आणखी उशीर करून चालणार नाही. आमची टारगेट्स असतात. आम्हाला विक्रमच हवा आहे विक्रम. (विक्रमला सगळे घट्ट पकडून ठेवतात.)

रीटा: अरे वा रे वा! म्हणे विक्रमच हवा आहे विक्रम. मलापण एक मर्सिडीज गाडी हवी आहे, म्हणून काय मिळेल की काय?

रोहन: यू डोन्ट ऑलवेज गेट व्हॉट यू वॉन्ट यमराज.

यश: विक्रम हवा असेल तरी तो तुम्हाला मिळणार नाही. तो आमचा दोस्त आहे. आम्ही त्याला जाऊ देणार नाही.

राकेश: आणि हवाच असेल तो, तर आम्हाला पण स्वीकारावं लागेल बच्चमजी.

शीला: आणि काय हो? कशाला हवा आहे विक्रम? त्याला काय... मलेरिया झाला आहे म्हणून?

रीटा: (शीलाला बाजूला सारते.) आणि ओ मिस्टर, मलेरिया काही आता जीवघेणा राहिलेला नाही. एवढं पण माहीत नाही का तुम्हाला? मग तुम्ही कसले यमराज?

यश: नाही तर काय?

यमराज: अरे बाबा रे, काय कटकट आहे? अरे, कोणत्या देशातून उचलून आणलीस ही मुलं? मी तर फक्त एकाच मुलाला आणायला सांगतिलं होतंस. आणि तू तर पुरी पलटणच घेऊन आला आहेस.

यमदूत: मी याला आणायला गेलो तर माझ्या अंगावर तुटूनच पडली. खूप मारलं हो मारलं. हे बघा, माझे गाल बघा. आम्ही पण येणार आहोत म्हणाली.

(यमराज विक्रमला स्वत:कडे खेचायला लागतो. हे बघून मुलं त्याला आपल्याकडे खेचू लागतात.)

यमराज: अरे गाढवा, कुठल्या देशातली मुलं आहेत, सांग आधी. आपल्या मत्रिासाठी एवढा मोठा त्याग करायला तयार आहेत. सांगतोस की आता तुलाच...?

(यमराज यमदूताला पकडणार इतक्यात कावराबावरा होत यमदूत म्हणतो)

यमदूत: सांगतो महाराज, ही भारतामधली मुलं आहेत भारतामधली. आता या देशातली जनता अन्यायावरुिद्ध एकत्र येऊन लढते आहे हे आपणास ठाऊक आहे. आत्तापर्यंत फक्त मोठी माणसंच अन्यायावरुिद्ध लढायची. पण आता मुलं पण तेच करतायत. माझा नाईलाज होता महाराज.

यमराज: (मटकन खाली बसतो.) अरे बापरे तथिली का आहेत ही मुलं?

रोहन: मग? काय वाटलं काय तुम्हाला? अं?

यश: तुमची हमित कशी झाली या फालतू आजाराची कारणं सांगून ह्याला इथं आणायची?

रीटा: ते काही नाही. जयिंगे तो साथमे और मरेंगे भी साथमे, क्या समझे?
(आरडाओरड गडबड सुरू करतात.)

यमराज: (खशिातून डायरी काढतो. काही तरी वाचतो.) काय मुलं आहेत! या यमराजाला नतमस्तक केलंत तुम्ही. आम्ही आजपर्यंत जविाला जीव देणारे असे छोटे दोस्त कधीच बघतिले नव्हते. (मुळुमुळु रडायला लागतो. मुलांना फारच गंमत वाटते.)

रीटा: अय्या यमराज, तुम्ही रडताय? आय कान्ट बलिीव्ह धसि.

यमराज: चुकलंच आमचं जरा. तुम्ही म्हणता ते अगदी बरोबर आहे. जा घेऊन जा तुमच्या मत्रिाला. तो या आजारातून नक्की बरा होईल.

(मुलांचा एकच गोंगाट सुरू. यमराज हैराण होतात.)

यमराज: केवढा आवाज करताय? कानठळ्या बसण्याची वेळ आलीये. आवाजकी दुनयिाके बेताज बादशाहा नघिा आता लवकर, नाहीतर...

वक्रिम: थॅन्क यू, यमराज. थॅन्क यू व्हेरी मच. यू आर नॉट सो बॅड आफ्टर ऑल.

राकेश: चला रे, तुला न्यायला आले होते काय?

वक्रिम: जाऊ दे रे, ज्याचा शेवट गोड ते सारंच गोड.
(मुलं 'यमराजकी जय हो!' चा नारा देत नघिून जातात.) यमराज आ वासून बघतच राहतो. यमदूत घटाघटा पाणी पतिो. तोही नघिून जाणार तेवढ्यात त्याला यमराज पकडतो.

यमराज: तू कुठे नघिून चालला आहेस? बघतोच तुला. (असं म्हणून त्याला बदडून काढतो. यमदूत 'अग आई ग! वाचवा वाचवा...' असं ओरडतो, तेव्हाच पडदा पडतो.)

This book was made possible by Pratham Books' StoryWeaver platform. Content under Creative Commons licenses can be downloaded, translated and can even be used to create new stories - provided you give appropriate credit, and indicate if changes were made. To know more about this, and the full terms of use and attribution, please visit the following link .

Story Attribution:

This story: दोस्ती झदिाबाद! मुलांसाठी वनिोदी नाटुकले is translated by Meera Dixit . The © for this translation lies with Pratham Books, 2015. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Based on Original story: ' Long Live Friendship! A Humorous Play for Children ' , by Meera Dixit . © Pratham Books , 2015. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license.

Other Credits:

This book has been published on StoryWeaver by Pratham Books.The development of this version of the book has been supported by HDFC Asset Management Company Limited (A joint venture with Standard Life Investments). www.prathambooks.org

Illustration Attributions:

Cover page: A group of smiling children , by Shailja Jain Chougule © Pratham Books, 2015. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 2: Gang of Friends , by Shailja Jain Chougule © Pratham Books, 2015. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 3: Characters in 'Long Live Friendship' , by Shailja Jain Chougule © Pratham Books, 2015. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 10: Children peeking and watching Yamdoot speaking to a boy , by Shailja Jain Chougule © Pratham Books, 2015. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 15: Girl offering medicine to yamdoot , by Shailja Jain Chougule © Pratham Books, 2015. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 19: Yamdoot and gatekeeper talking, children shouting at the back , by Shailja Jain Chougule © Pratham Books, 2015. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 23: Yamraj, Yamdoot and a group of children , by Shailja Jain Chougule © Pratham Books, 2015. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 27: Yamdoot and children dragging the boy, Yamraj watching , by Shailja Jain Chougule © Pratham Books, 2015. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 30: Yamraj crying as children shout in joy , by Shailja Jain Chougule © Pratham Books, 2015. Some rights reserved. Released under

CC BY 4.0 license. Disclaimer: https://www.storyweaver.org.in/terms_and_conditions

Some rights reserved. This book is CC--BY--4.0 licensed. You can copy, modify, distribute and perform the work, even for commercial purposes, all without asking permission. For full terms of use and attribution, http://creativecommons.org/licenses/by/4.0/

दोस्ती झिंदाबाद! मुलांसाठी विनोदी नाटुकले (Marathi)

विक्रम आजारी पडतो तेंव्हा यमदूत त्याला न्यायला येतो. विक्रमची जिवलग मित्रमंडळी मात्र त्यावरोधात अतशिय ठाम आहेत. हे भन्नाट विनोदी नाटुकले मुलांना करायला आणि प्रेक्षकांना बघायला खूप आवडेल.

या पुस्तकाची वाचन पातळी ४ आहे. आत्मविश्वासाने, ओघवते वाचन करणाऱ्या मुलांसाठी.

PRATHAM BOOKS
storyweaver

Pratham Books goes digital to weave a whole new chapter in the realm of multilingual children's stories. Knitting together children, authors, illustrators and publishers. Folding in teachers, and translators. To create a rich fabric of openly licensed multilingual stories for the children of India -- and the world. Our unique online platform, StoryWeaver, is a playground where children, parents, teachers and librarians can get creative. Come, start weaving today, and help us get a book in every child's hand!